आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शनिवार दिनांक ०७ जून २०२५

ठळक बातम्या

- जलसमस्या हाताळण्यासाठी पाणी संचय आणि पुनर्भरण विषयी विचार आवश्यक - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.
- आदर्श जीवन शैलीतून मधुमेह टाळता येणे शक्य - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं नागपुरातील हॅलो डायबेटीज परिषदेत प्रतिपादन.
- सौर ऊर्जेवरील उपसा सिंचन योजना शेतकऱ्यांसाठी ठरणार वरदान - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला विश्वास.
- देशभरात बकरी ईदचा उत्साह, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि पंतप्रधानांनकडून देशवासियांना शुभेच्छा.

पानी परिषद

आज सर्वत्र जल समस्या भेडसावत असताना जलसंचय आणि पुनर्भरण यावर विचार आवश्यक असल्याचं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि जन कल्याणकारी समिती नागपूर यांच्या संयुक्त विद्यमानं, वनामती सभागृह, धरमपेठ नागपूर इथं विदर्भ पाणी परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. त्यावेळी उद्घाटन सत्रात ते बोलत होते.

*या ठिकाणी तीन विषयांवर विशेषतः या ठिकाणी मंथन आणि चिंतन करणार आहोत ज्यामध्ये पिण्याचं पाणी आहे, ज्यामध्ये कृषी उपयोगाचे पाणी आहे आणि ज्यामध्ये औद्योगिक उपयोगाचं पाणी आहे मला असं वाटतं की या तिन्ही विषयावर विचार करताना आपल्याला त्याच्यासोबत जलसंवर्धनाचा विचार करावा लागेल. जल पुनर्भरणाचा विचार करावा लागेल.वॉटर रियुजचा विचार आपल्याला करावा लागेल. या सगळ्या गोष्टी जोपर्यंत आपण करणार नाही तोपर्यंत जल समस्येत मग आपल्याला बाहेर येता येणारं नाही.*

मानवाचं जीवन हे पाण्यावर अवलंबून असल्यानं, पाण्याचं महत्व हे सर्वांनी समजून घेणे आवश्यक आहे. आज ज्या प्रकारचे पावसाचे पॅटर्न तयार झालेले आहे, त्यामुळे देखील पाण्याचा प्रश्न अत्यंत ऐरणीवर आलेला आहे, अश्यात ही परिषद आयोजित केल्यानं, त्यांनी अभिनंदन केलं. दरम्यान, पाणी परिषदेच्या निमित्तानं वनामती इथल्या योगा हॉलमध्ये आयोजित वैनगंगा जलप्रदर्शनीचे उद्घाटन माननीय प्रभारी कुलगुरू डॉ.माधवी खोडे चवरे यांच्या शुभहस्ते आज करण्यात आलं.

फडणवीस माध्यम संवाद

कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी हे महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीमध्ये वाढलेल्या मतदार संख्येबाबत नेहमी कुठल्याही तथ्या शिवाय खोटे बोलून जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करत आहेत. त्यांनी बिहारमध्ये स्वतःच्या पक्षाची हार यानिमित्ताने मानली आहे. त्यांनी जमिनीवर उतरून तथ्य समजून घेणे आवश्यक आहे, नाहीतर त्यांची पार्टी ही कधीच जिंकणार नाही असं प्रतिपादन, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज, नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलताना केलं. राहुल गांधींनी बिहारमध्ये महाराष्ट्रातील निवडणुकांबाबत वक्तव्य केलं होते. त्या संदर्भात फडणवीस बोलत होते. महाराष्ट्रातील वाढत्या मतदार संख्येबाबत पूर्वीच केंद्रीय निवडणूक आयोगानं सप्रमाण स्पष्ट केले आहे परंतु, राहुल गांधी ही रोज नवीनवीन खोटे विधाने करून, महाराष्ट्रातील जनतेचा तसंच लाडक्या बहिणीचा अपमान करत आहे असं, फडणवीस यांनी सांगितलं.

सायकल वाटप-मुख्यमंत्री

मुख्यमंत्री फडणवीस यांचा हस्ते आज नागपुरात, **100** गरजू शाळकरी विद्यार्थिनींना सायकलचं वाटप तसंच धन्वंतरी आरोग्य शिबिराचं आयोजन करण्यात आलं होते. यावेळी आमदार प्रवीण दटके, आमदार संदीप जोशी यांच्यासह अनेक जण उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विधानसभा मतदारसंघ असलेल्या दक्षिण पश्चिम परिसरातील, नविन मनिष नगर इथं, **R.B.L.** बँकेनं आपल्या **C.S.R.** फंडातून, शाळकरी मुलींना, **100** सायकल वाटप आणि आरोग्य शिबिराचं आयोजन केलं होते.

11 वर्ष-सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळं, भारतानं गेल्या दशकात, उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. आकाशवाणी न्यूज श्रोत्यांसाठी, गेल्या अकरा वर्षात, प्रमुख क्षेत्रांमधील सरकारच्या प्रयत्नांवर एक विशेष लेख सादर करत आहे. त्यात आज आम्ही स्वच्छ ऊर्जेच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय प्रयत्नांवर प्रकाश टाकत आहोत. यावर आधारित वृत्त देत आहे, वृत्त विभागातून हेमांगी कुळकर्णी.......

*गेल्या दशकात, भारताने स्वच्छ ऊर्जेच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे आणि हवामान कृतीमध्ये जागतिक नेतृत्व म्हणूनही उदयास आला आहे.देशाने २०२४-२५ या आर्थिक वर्षात विक्रमी २९.५२ गीगावॅट अक्षय ऊर्जा क्षमता जोडली, ज्यामुळे एकूण क्षमता २२०.१० गीगावॅट झाली, जी मागील वर्षी १९८.७५ गीगावॅट होती. यामध्ये सौर आणि पवन ऊर्जेतील वाढ आणि अणुऊर्जा क्षमतेत लक्षणीय वाढ समाविष्ट आहे.भारत आता अक्षय ऊर्जा देश आकर्षण निर्देशांकात ७ व्या क्रमांकावर आहे. राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन, विस्तारित जैवऊर्जा कार्यक्रम आणि विद्युत गतिशीलतेकडे वाढता बदल यासारख्या उपक्रमांमुळे कमी-कार्बन अर्थव्यवस्थेचा पाया रचला जात आहे.स्वच्छ ऊर्जेचा हा प्रयत्न भारताच्या जागतिक हवामान नेतृत्वाशी खोलवर जोडलेला आहे. २०३० च्या नऊ वर्षे आधीच भारताने त्याच्या स्थापित वीज क्षमतेपैकी ४० टक्के वीज विविध इंधन स्रोतांमधून मिळवण्याचे **COP21** चे लक्ष्य साध्य केले आहे.*

हॅलो डायबिटीज' -फडणवीस

पारंपारिक जीवनशैलीतून विकसित झालेल्या आहारविषयक सवयींमध्ये शहरीकरणामुळे अनुचित बदल झाले आहेत. त्याचा दुष्परिणाम म्हणून कमी वयात विविध आजार बळावत आहेत. आदर्श जीवनशैलीचा स्वीकार करून मधुमेहापासून दूर राहता येणे शक्य असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात केलं. डायबिटीज केअर अँड रिसर्च सेंटर व डायबिटीज केअर फाउंडेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने 'हॅलो डायबिटीज' या बाराव्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले. भारतात मोठ्या प्रमाणात पसरत जाणारा मधुमेह आणि ओबेसिटी ही गंभीर व चिंतेची बाब असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, भारत ही मधुमेहाची राजधानी होऊ नये यासाठी आयोजित

करण्यात येणाऱ्या अशा जनजागृतीपर परिषदांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या आजारांना दूर ठेवण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी फिट इंडिया मुव्हमेंट या सारखे विविध उपक्रम हाती घेतले असून यातून आरोग्य विषयक जनजागृतीला प्राधान्य दिले जात आहे.

उपसा सिंचन -गडकरी

शेतकऱ्यांसाठी पाणी हा कळीचा मुद्दा असून, त्यांना नियमीत पाणी मिळाले तर, केवळ शेतीचाच प्रश्न सुटणार नाही. तर गावातील एकूणच समस्या मार्गी लागतील. मुरादपूर उपसा सिंचन योजना आजपासून लोकांच्या सेवेत अर्पण करण्यात आली आहे. सौर ऊर्जेवरील ही उपसा सिंचन योजना या भागातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे असा विश्वास, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. उमरेड तालुक्यातील वडगाव जलाशयावर, वेणा नदीवरील सौर ऊर्जेवर संचालित, मुरादपूर उपसा सिंचन योजनेचं, गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी गडकरी म्हणाले की सौर ऊर्जेमुळे, शेतीसाठी पाणी उपलब्ध होणार आहे -

*हे साडेसात साडेसात हॉर्सपॉवरची जे तीन पंप आहेत. हे फ्लोटिंग सोलर पॅनल आपण आता तलावात सोडलेली आहे. त्यावर वीज मिळणार आहे. त्यातून हे चार्ज होणार आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे आपल्या सगळ्यांची सोय या सौरव ऊर्जेमुळे जे पाणी उपलब्ध होणार आहे त्या आपल्या जमिनीमध्ये उपलब्ध मिळाल्यामुळे आपण दोन किंवा तीन उत्पन्न घेऊन या ठिकाणचा शेतकरी समृद्ध आणि संपन्न होण्याचा मार्ग आपल्याला मिळालेला आहे.*

या भागात ५३ टक्के आदिवासी लोक राहतात. हा परिसर सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक दृष्ट्या मागास असून, त्यामुळे या समाजासह, इथल्या एकूणच सर्वसामान्य लोकांचं जगणे सुसह्य करणे गरजेचं आहे. त्यादृष्टीने पं.दिनदयाल उपाध्याय यांनी दिलेला, अंत्योदयचा संदेश घेऊन आम्ही काम करतोय. समाजातील उपेक्षित वर्गाला परमेश्वर मानून त्याची निरंतर सेवा केली पाहिजे, हे त्यांचे सामाजिक-आर्थिक चिंतन आम्ही जोपासले आहे याचाही गडकरी यांनी उल्लेख केला. शेतकऱ्यांना पाणी मिळाले आहे, आता फार्मर प्रोड्युस कंपनी तयार करावी, असे आवाहन गडकरी यांनी केले.

ईद-ऊल-अझहा

देशभर आज पारंपरिक उत्साहानं आणि श्रद्धेनं साजरा केल्या जात असलेल्या, ईद-ऊल-अझहा अर्थात बकरी ईद निमित्त, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि पंतप्रधान यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. मुस्लिम बांधवांनी आज ईदगाह आणि मशिदीत जाऊन, ईद निमित्त नमाज अर्पण केले आणि परस्परांना शुभेच्छा दिल्यात. राजधानी दिल्लीमध्ये, जामा मशिद, फतेहपुरी मशिद आणि शाही ईदगाह इथं, ईदचा मुख्य सोहळा पार पडला. ईदचा सण हा, त्याग, श्रद्धा आणि मानवी मूल्यांचं प्रतीक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. हा सण समाजात एकता, प्रेम आणि बंधुभावाचा प्रसार करतो असं त्या म्हणाल्या. ईदचा सण सर्वांना त्याग, सामर्थ्य, आणि औदार्याच्या शक्तीची जाणीव करून देतो असं, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. ईद-ऊल-अझहाच्या माध्यमातून केल्या जात असलेल्या निःस्वार्थी आणि सेवेच्या मूल्यांमुळे, देशाची लोकशाही रचना समृद्ध होत असून, आपल्या वैविध्यपूर्ण समाजाचे बंध अधिक दृढ होतात असं ते म्हणाले. या सणामुळे समाजात सुसंवादाची प्रेरणा आणि शांतीचे बंध अधिक दृढ होतात असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी सर्व नागरिकांना सुदृढ आरोग्यासाठी आणि समृद्धीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

*****